नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३४५ Issue - 345 | वार रविवार दि. ४ मे २०२५ Blow- Sunday Date 4 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## यात्रेत चेंगराचेंगरी; ७ जणांचा मृत्यू

### गोव्यातील लैराई देवीच्या यात्रेदरम्यान घडली घटना; ३० हून अधिक लोक जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पणजी : गोव्यातील लैराई देवीच्या यात्रेदरम्यान शुक्रवारी भीषण दुर्घटना घडली. यात्रेदरम्यान मध्यरात्री ३ वाजताच्या दरम्यान चेंगराचेंगरी झाली. या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला, तर ३० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. या दुर्घटनेबाबत अद्याप कोणतंही ठोस कारण समोर आलं नाही. लैराई देवीची यात्रा ही गोव्यातील सर्वात महत्त्वपूर्ण उत्सवांपैकी एक असून या यात्रेसाठी भाविकांची मोठी गर्दी होते.

पारंपारिक धोंडाची जत्रा यासाठी हजारोंच्या संख्येने लोक यात्रेत सहभागी होता. धोंडाची जत्रा हे यात्रेतील प्रमुख आकर्षण आहे. गोव्यातील ही देवीच्या यात्रेतील पारंपरिक प्रथा आहे. लैराई देवीची जत्रा ही केवळ धार्मिक प्रथा नसून ही गोव्याची संस्कृती असून राज्यातील आध्यात्मिकतेचा भाग आहे. दरवर्षी राज्यभरातून ५० हजारांहून अधिकच्या संख्येत भाविक देवीच्या यात्रेत सहभागी होतात. लैराई देवी ही देवी पार्वतीचं रुप मानलं जातं. अनेक भक्त या यात्रेत जळत्या निखाऱ्यांवर विना चप्पल चालतात. विना चप्पल चालत ते देवीला मान देत असल्याचं बोललं जातं.



यात्रेमध्ये चेंगराचेंगरी झाल्यानंतर तात्काळ आपत्कालीन सेवा सुरू करण्यात आल्या. जखमी झालेल्या भाविकांना त्वरित गोवा मेडिकल कॉलेज बांबोलिम आणि म्हापशातील उत्तर गोवा जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं. या घटनेनंतर गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत तात्काळ पीडितांच्या चौकशीसाठी रुग्णालयात दाखल झाले. यावेळी त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी सुलक्षणा सावंत आणि राज्यसभा खासदार सदानंद तानावडे आणि आमदार प्रेमेंद्र शेत, कार्लोस फरेरा उपस्थित होते. मुख्यमंत्री आणि इतरांनी रुग्णालयासह चेंगराचेंगरी झालेल्या ठिकाणीही पाहाणी केली.

लैराई देवीच्या यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी लक्षात प्रशासनाकडून जवळपास १००० च्या संख्येने पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. तसंच गर्दीवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोनदेखील लावण्यात आले होते. या व्यवस्था असूनही स्थिती नियंत्रणाबाहेर गेली आणि दुर्घटना घडली.

यात्रेत आग लागल्याची अफवा पसरली आणि चेंगराचेंगरी झाली अशी माहिती समोर आली आहे. तसंच ही चेंगराचेंगरी एका उतारावर झाल्याचंही सांगितलं जात आहे. उतारामुळे गर्दी वेगाने पुढे सरकली आणि लोक खाली पडले. यामुळे चेंगराचेंगरी झाली अशीही माहिती आहे. मात्र चेंगराचेंगरीचं स्पष्ट कारण अद्याप समोर आलं नाही. याप्रकरणी पोलिसांकडून तपास सुरू असून जखमींवर उपचार सुरू आहेत.

## साईबाबा मंदिर बॉम्बने उडवण्याची धमकी; यंत्रणा अलर्ट मोडवर

शिर्डी : शिर्डीतील साईबाबा मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी साई संस्थानला ईमेलद्वारे देण्यात आली आहे. हा धमकीचा ईमेल आल्यानंतर सुरक्षा व्यवस्था अलर्ट झाली असून भाविकांच्या सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात येत आहे. साईबाबा संस्थानसह हजारो पोलिसांचा ताफा सज्ज असून साईभक्तांनी कोणतीही भीती न बाळगता दर्शनासाठी यावं, असं आवाहन साईमंदिर प्रशासनाने केलं आहे..



शिर्डीतील साईबाबा हे लाखो भाविक-भक्तांचे श्रद्धास्थान आहे. हजारो भाविक दररोज साईबाबांचे आशीर्वाद घेण्यासाठी या मंदिरात जात असतात. मात्र शुक्रवारी सकाळी साई संस्थानच्या मेल आयडीवर एका अज्ञात व्यक्तीकडून धमकीचा मेल पाठवण्यात आला. आम्ही साईबाबा मंदिर बॉम्बने उडवू, असा उल्लेख या ईमेलमध्ये करण्यात आला होता. त्यानंतर सुरक्षा व्यवस्था अलर्ट मोडवर असून भाविकांनी घाबरून जाऊ नये, असं आवाहन मंदिर प्रशासनासह पोलिसांकडून करण्यात आलं आहे.

साईबाबा संस्थानचे सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी यांच्या तक्रारीवरून शिर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल झाली असून धमकीच्या पार्श्वभूमीवर साईमंदिराची बीडीएस आणि डॉग स्कॉडसह पथकाने कसून तपासणी केली आहे. साईमंदिराच्या सर्व प्रवेशद्वारावर भक्तांचीही कसून तपासणी केली जात असून धमकीचा मेल पाठवणाऱ्या अजित जाकोमेला नावाच्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साईबाबा मंदिराचे हजारो सुरक्षा कर्मचारी आणि पोलीस पथक भक्तांची काळजी घेण्यास सक्षम असून देशभरातील साईभक्तांनी निश्चिंतपणे साईदर्शनाला यावं, असं आवाहन साईमंदिराचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी केले आहे.

दरम्यान, यापूर्वी देखील शिर्डीच्या साई संस्थानला धमकीचे मेल आल्याच्या घटना घडल्या होत्या. परंतु यापूर्वीचे पत्र आणि मेल फेक असल्याचं स्पष्ट झालं होतं. अशातच साई संस्थानला पुन्हा धमकीचा मेल आल्याने खोडसाळपणातून कोणी हे कृत्य केले आहे का, या अनुषंगानेही पोलिसांकडून तपास केला जात आहे.

## जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री पंतप्रधान मोदींच्या भेटीला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला (जारी लर्वीश्रश्र) यांनी शनिवारी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी (झच् चेवळ) यांची भेट घेतली आहे. यावेळी उमर अब्दुल्ला यांनी त्यांच्याशी पहलगाम दहशतवादी हल्ल्यासह विविध मुद्द्यांवर चर्चा केली आहे, अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. पंतप्रधानांच्या निवासस्थानी दोन्ही नेत्यांमधील ही बैठक सुमारे अर्धा तास चालली असल्याचे समजते. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही नेत्यांमधील ही पहिलीच भेट आहे. या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. त्यापैकी बहुतेक पर्यटक होते.



जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आणि केंद्रशासित प्रदेशातील परिस्थितीवर चर्चा केली. काही वेळापूर्वीच ते पंतप्रधान निवासस्थानाहून रवाना झाले. पंतप्रधानांच्या निवासस्थानी झालेली ही बैठक सुमारे ३० मिनिटे चालली. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर या बैठकीला महत्व प्राप्त झाले आहे.

### पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर महत्वाची बैठक

भारताने पाकिस्तानविरुद्ध अनेक कठोर पावले उचलली आहेत. यामध्ये सिंधू जल करार स्थगित करण्याचा समावेश आहे. यामध्ये अटारी येथील एकात्मिक तपासणी नाका बंद करणे आणि उच्चायुक्तालयांमधील कर्मचाऱ्यांची संख्या कमी करणे समाविष्ट आहे. भारत सरकारने पाकिस्तानी नागरिकांना दिले जाणारे सर्व प्रकारचे व्हिसा रद्द केले आहेत. त्यांना ३० एप्रिलपर्यंत देश सोडण्याचे आदेश देण्यात आले. भारताने पाकिस्तानी विमान कंपन्यांसाठी आपले हवाई क्षेत्र देखील बंद केले आहे.

जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी सोमवारी सांगितले की, त्यांचे सरकार दहशतवादाविरुद्धच्या जनतेच्या मोहिमेला बळकटी देईल. कारण जनतेच्या सहकार्यानेच दहशतवादाचा पराभव करता येईल. जनतेला वेगळे करणारे कोणतेही पाऊल उचलण्यापासून सरकारने परावृत्त करावे, असा इशारा अब्दुल्ला यांनी दिला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी सभागृहात मांडण्यात आलेल्या ठरावावरील चर्चेचा समारोप करताना मुख्यमंत्री म्हणाले होते की, लोक आपल्यासोबत असतील तरच दहशतवाद किंवा अतिरेक संपेल. दहशतवादाविरुद्ध लोकांचा रोष पाहून, जर आपण योग्य पावले उचलली तर ही दहशतीच्या अंताची आता सुरुवात आहे.

जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सोमवारी सांगितले की त्यांचे सरकार दहशतवादाविरुद्धच्या जनतेच्या मोहिमेला बळकटी देईल. कारण जनतेच्या सहकार्यानेच दहशतवादाचा पराभव करता येईल. जनतेला वेगळे करणारे कोणतेही पाऊल उचलण्यापासून सरकारने परावृत्त करावे, असा इशारा अब्दुल्ला यांनी दिला. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी सभागृहात मांडण्यात आलेल्या ठरावावरील चर्चेचा समारोप करताना, मुख्यमंत्री म्हणाले की, लोक आपल्यासोबत असतील तरच दहशतवाद किंवा अतिरेकीवाद संपेल. दहशतवादाविरुद्ध लोकांचा रोष पाहून, जर आपण योग्य पावले उचलली तर ही दहशतीच्या अंताची सुरुवात आहे.

उमर अब्दुल्ला यांनी असेही म्हटले की, 'आपण असे कोणतेही पाऊल उचलू नये, ज्यामुळे लोक वेगळे पडतील. आपण बंदुकांच्या बळावर दहशतवादावर नियंत्रण ठेवू शकत नाही. पण जर लोक आपल्यासोबत असतील तर आपण दहशतवाद संपवू शकतो. मला वाटतं आता वेळ आली आहे.' जम्मू आणि काश्मीरमधील मोठ्या प्रमाणात झालेल्या निदर्शनांचा संदर्भ देताना अब्दुल्ला म्हणाले की, 'पहिल्यांदाच श्रीनगरच्या जामिया मशिदीत शुक्रवारच्या नमाजपूर्वी दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. आपण त्याचा अर्थ समजू शकतो. आम्ही हा बदल अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करू.'

## राज्यात अवकाळीचा इशारा, वादळी वाऱ्यासह पाऊस हजेरी लावणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात उन्हाच्या तडाख्याने नागरिक हैराण झाले आहेत. अशातच मात्र काही भागांत ढगाळ वातावरण आहे. भारतीय हवामान विभागाने आता राज्यातील काही भागांत अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. विदर्भासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. पुढील चार दिवस मिश्र स्वरुपाचे वातावरण राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

सध्या चक्राकार वारे सक्रिय झाल्याने महाराष्ट्रालगतच्या राजस्थान आणि मध्यप्रदेशात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. परिणामी महाराष्ट्रातही पावसाचा इशारा देण्यात आला आहे. सागर किनारपट्टीलगतचा भाग वगळता उर्वरित राज्यात उद्या ४ मे ला वीजांच्या गडगडाटासह पाऊस बरसण्याचा अंदाज आहे. तर ५ आणि ६ मे ला संपूर्ण राज्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे.



दरम्यान विदर्भात सध्या तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत आहे. सर्वच भागातील तापमानाचा पारा ४० अंशांच्या पुढे गेला आहे. विदर्भातील नागपूरसह वर्धा आणि भंडारामध्ये पुढील काही तास ढगाळ वातावरण राहणार असून वादळी वाऱ्याचा इशाराही देण्यात आला आहे. तर पुढील २ दिवस वादळी वाऱ्यासह पाऊस पडणार आहे. यामध्ये वीजांच्या गडगडाटाचीही शक्यता आहे. ४० ते ५० किमी ताशी वेगाने वारे वाहणार असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रविवार ४ एप्रिलला उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, अहिल्यानगर तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, विदर्भातील अमरावती यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, नागपूर, भंडारा गोंदिया गडचिरोली येथे अवकाळी पाऊस हजेरी लावणार आहे.


सोमवारी ५ एप्रिलला संपूर्ण राज्यात पावसाच्या सरी बरसण्याचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, विदर्भ येथे बहुतांश ठिकाणी पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मंगळवारी ६ एप्रिलला राज्यातील बहुतांश भागात पावसाची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रासह, कोकण पट्टा, मराठवाडा आणि विदर्भातील यवतमाळ आणि चंद्रपुरात पावसाचा यलो अलर्ट असणार आहे.

## आम्ही भारतावर हल्ला करू; सिंधूचं पाणी पेटलं, पाक संरक्षणमंत्र्यांच्या वल्गना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी सिंधू नदी पाणी वाटप करारावरून एक वादग्रस्त विधान केले आहे. पाण्यावरून त्यांनी भारताला युद्धाची धमकी दिली आहे. जर भारताने पाणी अडवण्यासाठी काही बांधकाम केले, तर पाकिस्तान हल्ला करेल आणि ते बांधकाम उद्ध्वस्त करेल, असे आसिफ म्हणाले.सिंधू नदी पाणी वाटप करारावर भारताने स्थगिती आणल्यापासून पाकिस्तान अस्वस्थ आहे.



पहलगाम हल्ल्यानंतर भारताने हा करार स्थगित केला. या हल्ल्यात २६ लोक मारले गेले, ज्यात बहुतेक पर्यटक होते.

पाकिस्तानला भीती आहे की भारत नद्यांचे पाणी रोखू शकतो. त्यामुळे त्यांच्या नागरिकांचे मोठे नुकसान होईल. पाकिस्तानचे पंतप्रधान म्हणाले आहेत की, भारतातून येणारे पाणी हे २४ कोटी पाकिस्तानी लोकांच्या जीवनासाठी खूप महत्त्वाचे आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, जर भारताने थोडे जरी पाणी रोखले, तरी पाकिस्तानात मोठी समस्या निर्माण होईल. पाकिस्तानातील शेती धोक्यात येईल आणि लोकांना पिण्यासाठीही पाणी मिळणार नाही. ख्वाजा आसिफ यांनी भारताला धमकी दिली आहे. ते म्हणाले, सिंधू नदीचे पाणी अडवण्यासाठी कोणतेही बांधकाम करणे हे पाकिस्तानवर हल्ला करण्यासारखे असेल.

### चीनच्या या धोरणामुळे भारताला धोका

### श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, अफगाणिस्तान व नेपाळची आर्थिक परिस्थिती बेताची

## ड्रॅगनचा विळखा; भारताच्या ८ पैकी ५ शेजाऱ्यांना गिळण्याच्या तयारीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : चीन दक्षिण आशियामध्ये आपले पाय रोवत आहे. कर्ज देऊन आणि मोठे प्रकल्प उभारून चीनने अनेक देशांची कोंडी सुरु केली आहे. यामुळे अनेक देशांची आर्थिक परिस्थिती नाजूक झाली आहे. श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि नेपाळ हे देश अडचणीत आहेत. बांगलादेशमध्येही गडबड सुरु आहे. लोक रस्त्यावर उतरून विरोध करत आहेत. कट्टरतावादी विचारचारा वाढत आहे. उद्योजक राजेश साहनी म्हणतात की दक्षिण आशियातील ८ पैकी ५ अर्थव्यवस्था कोसळल्या आहेत. श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि नेपाळ यांची आर्थिक स्थिती तोळामासा आहे. हे पूर्णपणे खरं नसलं, तरी परिस्थिती गंभीर आहे. चीनच्या या धोरणामुळे भारताला धोका निर्माण झाला आहे.

बांगलादेशमध्ये परिस्थिती ठीक नाही. तिथे कायद्याचं राज्य नाही. लोक हिंसक आंदोलने करत आहेत. कट्टरतावादी विचार वाढले आहेत. सरकार परिस्थितीला आवर घालण्यात कमी पडत आहे.परिस्थिती आणखी बिघडू शकते, असा इशारा सैन्यानेच दिला आहे. महागाई वाढत आहे. गुंतवणूक कमी होत आहे आणि विकास दर ३.३-३.९% पर्यंत खाली आला आहे. त्यामुळे बांगलादेशची अर्थव्यवस्था नाजूक स्थितीत आहे.

श्रीलंकेची अवस्थाही बिकट आहे. थोडा विकास दर असला तरी, गरिबी, महागाई आणि चलनाची घसरण यांसारख्या समस्या आहेत. २०२२ मध्ये श्रीलंका परदेशी कर्ज फेडू शकला नाही. अजूनही त्यांना चीनला त्यांच्या कर्जाचा मोठा भाग द्यायचा आहे. अनेक प्रकल्पांमुळे अपेक्षित फायदा झाला नाही. त्यामुळे कर्ज फेडणे हे श्रीलंकेसाठी मोठे आव्हान आहे.

मालदीवची अर्थव्यवस्था पर्यटनावर अवलंबून आहे. त्यांचा



ऋउझ विकास दर ६.४% राहण्याची शक्यता आहे. पण मालदीवच्या सार्वजनिक कर्जापैकी जवळपास २०% चीनला द्यायचे आहेत. त्यामुळे जर काही संकट आले, तर मालदीवची अर्थव्यवस्था कोलमडू शकते. मालदीव आणि चीन यांच्यातील ऋढ (फ्री ट्रेड ॲग्रीमेंट) मुळे व्यापार तोटा वाढू शकतो. ऋढ म्हणजे 'मुक्त व्यापार करार'. यामुळे स्थानिक उद्योगांना फटका बसू शकतो.

पाकिस्तानमध्ये राजकीय अस्थिरता आहे. बेरोजगारी वाढली आहे आणि अर्थव्यवस्था नाजूक आहे. उझएउ (चायना-पाकिस्तान इकोनॉमिक कॉरिडोर) च्या माध्यमातून चीनकडून मिळालेल्या कर्जामुळे पायाभूत सुविधा सुधारल्या असल्या, तरी कर्जही वाढले आहे. उझएउ म्हणजे 'चीन-पाकिस्तान आर्थिक मार्ग'. यामुळे पाकिस्तानच्या सार्वभौमत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गुंतवणूकदारांचा विश्वास अजूनही डळमळीत आहे.

अफगाणिस्तानची अर्थव्यवस्थाही बिकट आहे. हा देश मदतीवर अवलंबून आहे आणि गरिबीशी झुंजत आहे. चीनचा अफगाणिस्तानशी असलेला संबंध कमी आहे, पण तो हळूहळू वाढत आहे. नेपाळ कागदोपत्री स्थिर दिसत असला, तरी चीनसोबतचा व्यापार तोटा वाढत आहे. तो बीजिंग समर्थित पायाभूत सुविधांवर जास्त अवलंबून आहे.


दक्षिण आशियातील अनेक देश चीनच्या कर्जाच्या जाळ्यात अडकत चालले आहेत. यामुळे या देशांच्या अर्थव्यवस्था आणि राजकारणावर वाईट परिणाम होत आहे. या देशांना त्यांची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आणि चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी ठोस पाऊले उचलावी लागतील. भारतासाठी दक्षिण आशियामध्ये चीनचा प्रभाव वाढणे धोक्याचे आहे. कारण भारत हा चीनचा थेट प्रतिस्पर्धी आहे. या सगळ्या परिस्थितीमुळे भारताला सतर्क राहण्याची गरज आहे. चीनच्या वाढत्या प्रभावाला रोखण्यासाठी भारताला आपल्या शेजारी देशांना मदत करावी लागेल आणि त्यांच्यासोबत चांगले संबंध ठेवावे लागतील.

# टेम्पोवरून प्रवास सुरू करणाऱ्या विष्णू मुसळेंनी उभा केला यशाचा कळ्ला.....

## संघर्ष, जिद्द आणि सेवाभावाचं जिवंत उदाहरण...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा प्रतिनिधी/ज्ञानेश्वर गुरव : मराठवाड्याच्या मातीतून उगम पावलेली ही कथा आहे एका खऱ्या हिरोची. उमरगा तालुक्यातील तुगाव या छोट्याशा गावात जन्मलेल्या विष्णू प्रदीप मुसळेंनी परिस्थितीच्या माऱ्याला हार न मानता, त्यावर स्वप्नांची ढाल उभी केली आणि आज तो अनेक जणांच्या प्रेरणास्थान झालाय.



हातात नव्हतं काहीच पण डोळ्यांत होतं स्वप्न जग बदलण्याचं!

घरची परिस्थिती हलाखीची. वडील शेतमजूर. लहानपण कष्टात गेलं. शिक्षण दहावीपर्यंतच. पण मनात जिद्द होती – स्वतःचं आयुष्य घडवायचं आणि इतरांचंही!

टेम्पोवर हमालीपासून प्रवास सुरू आज चार टेम्पोंचा मालक!

विष्णूने सुरुवात केली ती मजुरीपासून. माल चढवणं, उतरणं, दिवसरात्र कष्ट करणं. पण या अनुभवातूनच त्याने व्यवसायाचे धडे गिरवले. कालांतराने स्वतःचा टेम्पो घेतला आणि आज त्याच्याकडे चार टेम्पो आहेत.

'प्रज्ञान उपहारगृह' – श्रमातून साकारलेलं यशाचं ताजमहाल!

टेम्पो व्यवसायाबरोबरच त्याने उमरग्याच्या एस.टी. स्टँडवर सुरू केलं 'प्रज्ञान उपहारगृह' – एक स्वच्छ, दर्जेदार आणि लोकांना परवडणारं हॉटेल. या दोन व्यवसायांतून विष्णू दररोज २० लोकांना रोजगार देतो. त्याच्यासाठी हे कर्मचारी नाहीत, तर कुटुंब आहेत.

माझा नफा म्हणजे कोणाचं घर चालणं!

पुणे, हैदराबादसारख्या शहरात मजुरीसाठी जाणाऱ्या गरीब मजुरांना तो स्वतःच्या टेम्पोमधून मोफत ने-आण करतो. त्यांच्याकडून एक रुपयाही घेत नाही. जेव्हा माझ्या टेम्पोमुळे एखाद्याचं घर चालतं – तेव्हा तेच माझं यश, असं तो समाधानानं सांगतो.

व्यवसाय त्याच्या दृष्टीनं म्हणजे – समाजाची जबाबदारी!

विष्णूचा व्यवसाय म्हणजे केवळ पैशाचा खेळ नव्हे. तो आहे माणुसकीचा, आधाराचा आणि सहवासाचा. त्याचं आयुष्य हे समाजासाठी वाहिलेलं आहे.

ही कथा डिग्रीची नाही – ती आहे दिशा ठरवणाऱ्या ध्यासाची!

आज विष्णू मुसळे हे नाव मराठवाड्यातील युवकांसाठी जिंकण्याची जिद्द काय असते याचं जिवंत उदाहरण ठरतंय. कारण अडचणी कितीही असल्या जर मनात आग असेल, तर यश दूर नसतं – हे त्याचं जीवन सांगून जातं!

# डॉ. शिरीष वळसंगकर....सोलापूर
# घुसमट, विश्वास, निष्ठा आणि समन्वय याचा बळी


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिरीष गेला. सोलापूरकरांच्या मनात घर करुन राहणारा शिरीष वळसंगकर गेला. अनेक रुग्णांच्या हृदयात वास्तव्याला असणारा डॉक्टर शिरीष वळसंगकर गेला. आपण होऊन जग सोडून गेला. तो का गेला? त्याला का जावेसे वाटले? तो असा कसा गेला? या प्रश्नांना आता उत्तरे शोधण्यात अर्थ नाही. तो जाताना कोणावर दोषारोप करुन गेला का? हा विषय आता चर्चा करण्याइतका महत्त्वाचा वाटत नाही. आपल्या कर्तुत्वावर वैद्यकीय साम्राज्य उभे करणारा शिरीष. वैद्यकीय क्षेत्रातील एका जटील शाखेत, म्हणजे शरिरातील मेंदू आणि मणका तथा मज्जारज्जू व्यवस्था विकारांमध्ये यशस्वी उपचार करणारा शिरीष.

सगळे जग सोडून, आपली जन्मभूमी कर्मभूमी स्वीकारत, सोलापूर सारख्या ठिकाणी वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट सेवा देण्याचे पुण्य कर्म करणारा शिरीष. हे पुण्य त्याला अंतकाळी साथ देऊ शकले नाही. अनेकांचे जीव वाचवणारा शिरीष आपला स्वतःचा जीव घेईल हे कोणाच्या स्वप्नातही आलेले नसेल. आपल्या ज्या मेंदूच्या बळावर, त्याने हजारो लोकांच्या मेंदूवर उपचार केले, तो शिरीष एक दिवस आपलाच मेंदू उध्वस्त करेल असे वाटले नव्हते.

शिरीष प्रसिद्धीसाठी काम करतच नव्हता. शिरीष प्रसिद्ध झाला तो हृदया हृदयातून. शिरीष बद्दल व्यक्त होत असताना कोणाला भावना अनावर झाल्या, कोणाला शब्द अपुरे पडले, तर काही जण स्तंभित झाले. साऱ्यांचेच डोळे पाणावले होते हे मात्र खरे. रक्ताच्या नात्याला ही पाणावले नसते त्या पेक्षा अधिक पाणावलेले डोळे सोलापूरकरानी अनुभवले आहेत. या साऱ्यांचे शिरीष बरोबर नुसते डॉक्टर-रुग्ण असे संबंध होते का? तर तसे नाही. सर्वच क्षेत्रातील, सर्वच प्रांतातील व्यक्तींचे हे अनुभव होते.

नेमके असे का झाले. शिरीष ला जीवन संपवावे का वाटले? शिरीष ने आत्महत्या का केली? अनेकाना मृत्यू पासून वाचविताना शिरीष च्या मृत्यूवर च, प्रश्न उपस्थित व्हावेत, ही मोठी मन अस्वस्थ करणारी घटना घडली आहे.



शिरीष हा स्वतःच्या कष्टाने उभा केलेल्या एका वैद्यकीय साम्राज्याचा सम्राट होता. हे साम्राज्य उभे करत असताना जे मदतीला आले, त्यांना मदतीला घेत शिरीष उभा राहिला. वैद्यकीय क्षेत्रातील अद्ययावत सोयी सुविधांचा पाठपुरावा त्यांनी केला. आपले सारे आर्थिक व्यवहार पारदर्शक असली पाहिजेत हा शिरीष चा विचार मन अचंबित करणार आहे. वैद्यकीय व्यवसाय म्हणाला की पैशाची गफलत हे ठरलेले गणित. शिरीष ने हे खोटे करून दाखवले.

शिरीष च्या मृत्यूस जबाबदार कोण? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात खरंच काही अर्थ आहे का? शिरीष च्या मृत्यूस व्यवस्थापकीय महिला जबाबदार का गृहकलह? यावर वृत्तपत्रे चर्वितचर्वण करीत आहेत. पोलीस यंत्रणा आणि न्यायालय कागद चिवडत बसतील. तेवढेच त्यांचे काम आहे.

आपल्या व्यवसायाच्या सुरुवातीपासून जे सोबत होते त्यांना शिरीष ने मोठे केले. अशा व्यक्तींना समाजात मानमरातब मिळाला. त्यांच्या स्वतःच्या आयुष्यात आर्थिक स्थिरता आली. कोणाच्या कुटुंबातले काय प्रश्न असतील हा ज्याचा त्याचा प्रश्न. शिरीष ने आपल्या सोबत जे होते त्यांचे प्रश्न आपल्या परीने सोडविण्याचे काम केले. अशा परिस्थितीत ज्या सहकाऱ्याला खालपासून उच्च पदापर्यंत आपण नेले त्याने धमकी द्यावी, हे संवेदनशील मनाला अस्वस्थ करणारे असते. धमकी काय तर मी मुलांना जाळुन टाकीन आणि मी ही आत्महत्या करेन. ही धमकी मी दिलीच नव्हती असे संबंधित महिलेने सांगितलेले कानावर आलेले नाही. म्हणजे ती दिली होती. तिने नंतर मागितलेली माफी ही दुखावलेल्या मनावर कधीच फुंकर घालू शकत नाही. या धमकीमुळे जो आघात व्हायचा तो होऊन गेला.

आपल्या रुग्णालयातील ज्या कर्मचाऱ्याला सर्व अधिकार दिले होते आणि सांभाळले होते, त्यांनी अशी भूमिका घेणे निश्चितच मनस्ताप देणारे आहे. एक संवेदनशील मन शिरीष जवळ होते. मनाची ही संवेदनशीलता शिरीष ला अस्वस्थ करून टाकलेली असणार आहे. शिरीष या धमकीच्या घटनेने व्यथित झाला असेल, तर ते चुकीचे नाही. पण केवळ यामुळे तो जगाचा निरोप घेण्याचा निर्णय घेईल असे नाही.

दुसरी सातत्याने सांगीतली जाणारी बाब म्हणजे गृहकलह. नुसत्या गृह कलहाने कोणी आपले आयुष्य संपवत नाही. आज प्रत्येक कुटुंबात गृहकलह आहे. अनेक कारणे त्यात गुंतलेली आहेत. संपत्ती असू दे नसू दे. प्रतिष्ठा असुदे नसू दे. शिक्षण असू दे असू दे. अलीकडची घरे गृह कलहाने समृद्ध होत चाललेली आहेत असे खेदाने म्हणावे लागेल. माणूस जसा प्रगत झाला आणि शिक्षित झाला, तसा तो स्वतंत्र झाला. स्वतंत्र म्हणजे एवढा स्वतंत्र की त्याला कुटुंबातील आपली नाती ही अडचणीची वाटायला लागली. आपले स्वतःचे अस्तित्व वरचढ असले पाहिजे अशीच अनेकांची भावना होत चाललेली आहे. आणि हा वरचढपणा कोणास मान्य नसेल, तर मी कोणाशीही समजून घ्यायचे, पटवून घ्यायचे कारण नाही असाही एक उद्दामपणा दिवसेंदिवस प्रत्येकात वाढत चाललेला आहे.

पूर्वी कुटुंबाला स्वतःची प्रतिष्ठा असायची. कुटुंब प्रमुखाला मान असायचा. त्याच्या शब्दाला किंमत असायची. हे सगळे आता संपलेले आहे. शिरीष ने उभे केलेले वैद्यकीय साम्राज्य त्याचे स्वतःचे होते. श्रद्धेने, निष्ठेने आणि मोठ्या कष्टाने त्यांनी उभे केले होते. एस पी इन्स्टिट्यूट ही त्याची संस्था त्याने कुटुंब प्रमुख या नात्याने उभी केली होती. त्याला कुटुंब प्रमुखाचा मान मिळायला हवा होता. तो जसा वरिष्ठ स्त्री कर्मचाऱ्यांकडून मिळाला नाही तसा तो कुटुंबातील सदस्या कडून मिळाला नसल्याबद्दल हे सांगितले जाते तेच खरे शिरीष चे दुःख असले पाहिजे.

ज्या साम्राज्याचा शिरीष अनभिषिक्त सम्राट होता, तेथे तो बे दखल होत असेल, तेथे तू दुर्लक्षित होत असेल, तर तो अस्वस्थ होणे स्वाभाविक आहे. गेल्या सात आठ वर्षात आपल्याच रुग्णालयातील दैनंदिन सहभाग शिरीष ने कमी केला होता. दोन पिढ्यांतील व्यवस्थापकीय आणि कार्यालयीन मतभेद हे त्याचे कारण सांगितले जाते. संस्था उभी करत असताना आणि चालवत असताना आर्थिक व्यवहारातील जी पारदर्शकता त्यांनी सांभाळलेली होती, ती विस्कळीत झाल्याचे त्याचे निदर्शनास येत होते, असे सांगितले जाते. रुग्णाबरोबरील संबंध नेहमी प्रेमाचे असले पाहिजेत. अर्थकारणाचे निमित्ताने त्यात कटूता येऊ नये. हे शिरीष ने आयुष्यभर सांभाळले होते.

रुग्णसेवा हा शिरीष ने उभ्या केलेल्या साम्राज्याचा पाया होता. तो पैशाच्या मागे नव्हता. रुग्णाच्या आणि नातेवाईकांच्या विनंती चे योग्य विश्लेषण करून तो त्यांना आर्थिक सूट देत होता. हा त्याच्या वागण्यातील माणुसकीचा मोठा भाग होता. तोच त्याने उभ्या केलेल्या संस्थेत डळमळीत होत होता. शिरीष ने जो आत्मसन्मान मिळवलेला होता, त्याला ठेच पोचलेली होती. व्यवहार आणि विश्वास यातील अंतर दिवसेंदिवस वाढत चालले होते. दोन पिढीच्या वैचारिक बैठकीतील फरक हे शिरीषला अस्वस्थ करणारे एक कारण असले पाहिजे. शिरीष सद्गुणांचा एक आदर्श होता. आजच्या व्यवहारिक जगतात हा सद्गुण कोणाला आवडत नसेल. म्हणून अशा व्यक्तीला बेदखल करणे योग्य नाहीच नाही. हा सगुण शिरीष ला विसरून जाणे केवळ अशक्य झालेले असणार आहे. कदाचित आजच्या व्यवहारिक जगतातील ती सद्गुण विकृती असेल. आणि कदाचित सद्गुणांचा त्याग करणे अशक्य झाल्याने शिरीष ने जगाचा निरोप घेण्याचा निर्णय घेतला असण्याची शक्यता आहे.

आपणच उभारलेल्या आपल्याच प्राणप्रिय संस्थेत शिरीष ची घुसमट होत असणार आहे. या संस्थेतील कामकाजात सर्व प्रमुखातील एकमेकांवरील विश्वास, निष्ठा आणि समन्वय याचा दिवसेंदिवस वाढत चाललेला अभाव हेच शिरीष ला आपले आयुष्य संपविण्याचा निर्णय घेण्या मागील कारण असले पाहिजे.

ही हत्या नाही. आत्महत्या नाही. घुसमट असणाऱ्या विचारांना मुक्त करणारी ही घटना असली पाहिजे.

एक सांगावेसे वाटते. एक होता शिरीष... जर असे एखादे भव्यदिव्य काव्य निर्माण झाले, तर ती खरी शिरीष ला श्रद्धांजली असेल. बाकी आत्महत्या आणि ती शोधण्यामागील धडपड ही एक औपचारिकता असेल.

**– श्रीनिवास माधवराव वैद्य**
**चार्टर्ड अकांउटंट सोलापूर**
**भ्रमणध्वनी क्रमांक**
९४ २०२ ६५६५६

## शिव बसव आंबेडकर संयुक्त जयंती साजरी करत गुणीजणांचा केला सन्मान

## लेझिम संघाने केलेल्या खेळाचे ग्रामस्थांनी केले कौतुक

# गोगांव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व सभा मंटप भूमिपूजन







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त मौजे गोगांव येथे विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात आले यावेळी गावातील व परिसरातील विविध विभागात काम करणाऱ्या गुणी जनाचे सन्मान करून पुरस्कार देण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अध्यक्षस्थानी भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप हे होते यावेळी व्यासपीठावर नंदकुमार सुरवसे, उपसरपंच तिपवा गायकवाड, प्रभारी सरपंच श्रुती भांगे, प्रदीप जगताप, सूर्यकांत जिरगे, स्वातंत्र्य सैनिक, महादेव गायकवाड, मौला नदाफ, नामदेव सोनकांबळे आदी उपस्थित होते.

यावेळी सूरज सोनके, महादेव सोनकवडे, भूषण साठे, शाम बाबर ज्ञानेश्वरी सोनकांबळे, मानवी गायकवाड यांनी मार्गदर्शनपर भाषण केले.

यावेळी बोलताना कमलाकर सोनकांबळे म्हणाले की यावर्षी आम्ही प्रथमच शिव बसव आंबेडकर संयुक्त जयंती साजरी करत एक समतेचे संदेश देण्याचे काम आमच्या समितीने केलेले असून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे आपल्या गावात सर्व जातीधर्माचे लोक गुण्या गोविंदाने राहत असून सर्वाचे सामाजिक भावनेचे विचार करून आम्ही मोठ्या उत्सवात संयुक्त जयंती साजरी करीत असताना गावातील गुणी जनाचं सन्मान सोहळा करताना आम्हाला आनंद होत आहे त्यांनी सामाजिक कार्यात केलेल्या कामाचे दखल घेत आम्ही त्याचे सन्मान केले आहे याचं बरोबर आम्ही जयंतीचे औचित्य साधून डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक व सभा मंटप भूमी पूजन केलेले आहे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी देत असून वस्तीच्या विकासासाठी आम्ही कायम कटिबध्द आहोत

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्ष किरण गायकवाड, शांतकुमार बनसोडे, परमेश्वर गायकवाड, सुरेश सोनकांबळे,लखन गायकवाड, नितीन गायकवाड, संजय गायकवाड, नामदेव बनसोडे, विनोद बनसोडे, स्वामिनाथ गायकवाड, प्रवीण गायकवाड, सुधाकर बनसोडे, विशाल बनसोडे, आदिने परिश्रम घेतले यावेळी अक्कलकोट नॉर्थ पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी अंगद गीते, मानुरे , अवताडे,साहेब या पोलीस अधिकारी यांनी बंदोबस्त ठेवले होते सूत्रसंचालन उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी केले आभार अजित गायकवाड यांनी मानले

**शिव बसव समाज भूषण पुरस्कार**

नंदकुमार राजाराम सुरवसे ( युवा उद्योजक), प्रदीप अंकुश जगताप (उत्कृष्ठ सरपंच ) कलप्पा चंद्रम वाडे ( माजी सैनिक)

कल्याणराव बापूराव बिराजदार ( कृषी सल्लागार ),एस बी पाटील ( उत्कृष्ठ अभियंता )

कलपा बसवंतराव पाटील ( सदन शेतकरी), संजय नानासाहेब सुरवसे (उत्कृष्ठ शिक्षक), भास्कर राम जगताप (जेष्ठ समाजसेवक), मौला सफिल नदाफ ( जेष्ठ समाजसेवक), शरणप्पा गणपती कलशेट्टी ( जेष्ठ समाजसेवक), सूर्यकांत गुरणा जीरगे (जेष्ठ समाजसेवक), एकनाथ शिवाजी जगताप (जेष्ठ समाजसेवक), शरणबसपा शिवकांत मुळजे (उत्कृष्ठ समाज सेवक)

**डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार**

रत्नाकर शरणप्पा गायकवाड (जेष्ठ आंबेडकर चळवळीचे नेता), महादेव धर्मा गायकवाड (स्वातंत्र्य सैनिक), चंद्रकला अप्पासाहेब गायकवाड (पोलीस पाटील), फकिरप्पा कलपा बनसोडे (उत्कृष्ठ पोलीस अधिकारी), शरणबसपा ज्ञानदेव सोनकांबळे (उत्कृष्ठ महापारेषण अधिकारी), अँड. आनंद बसणा बनसोडे ( उत्कृष्ठ वकील), अण्णाप्पा सीताराम सोनकांबळे ( उत्कृष्ट शिक्षक), कल्याणी शरणप्पा बनसोडे (PWD अधिकारी), डॉ. सूर्यकांत लकप्पा गायकवाड, (उत्कृष्ठ प्राध्यापक )

**मूकनायक युवा समाजभूषण पुरस्कार**

लखन सुदाम गायकवाड (युवा समाजसेवक), सुभाष कल्याणी गायकवाड (युवा समाजसेवक), आकाश हणमंत गायकवाड (युवा समाजसेवक), बलभीम रोहिदास बनसोडे (युवा समाजसेवक), सुरेश चंद्रशेखर सोनकांबळे (युवा समाजसेवक), महादेव परपा सोनकवडे (उत्कृष्ठ निवेदक), श्रुती अरविंद भांगे (युवा सरपंच) रा. किरनळी ता. अक्कलकोट, तीपवा शिवशरण गायकवाड (युवा उपसरपंच) रा.खैराट ता. अक्कलकोट, शाम प्रभाकर बाबर (युवा समाजसेवक) रा. वागदरी ता. अक्कलकोट, सूरज भारत सोनके (युवा समाज सेवक) रा. शिरवळ ता. अक्कलकोट, चंद्रकांत शिंगे बनसोडे ( युवा समाजसेवक) रा. वागदरी ता. अक्कलकोट, तेजाबाई संजय गुरव (अंगणवाडी सेविका), भाग्यश्री धोडेशा सोनकवडे (अंगणवाडी सेविका), मधुमती विजयकुमार गायकवाड (आशा सेविका), सिद्धेश्वर अशोक होटकर (इंडियन आर्मी, महार रेजिमेंट)

तथागत गौतम बुद्ध (बुद्धभूषण पुरस्कार) मल्लिनाथ मरेपा सोनकांबळे

**महात्मा फुले उद्योजक पुरस्कार**

दयानंद गोपीचंद बनसोडे ( युवा उद्योजक ), गौतम सीताराम बनसोडे ( युवा उद्योजक ) ,शिवशरण मौला सोनकांबळे ( युवा उद्योजक ) ,बसवराज गुंडप्पा गायकवाड ( युवा उद्योजक), दयानंद लक्ष्मण बनसोडे ( युवा उद्योजक ) यांना पुरस्कार देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती सन्मान केले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक भूमिपूजन

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व सभा मंटप भूमिपूजन उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप, नंदकुमार सुरवसे, श्रुती भांगे, सूरज सोनके, तीपवा गायकवाड यांच्या उपस्थिती भूमिपूजन करण्यात आले.**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित मिरवणूक मध्ये गौतम बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर, बसवेश्वर महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, टिपू सुलतान, यांचे प्रतिमेचे मिरवणूक काढण्यात आले यावेळी निळा वादळ ग्रुप लेझिम संघ गोगांव, महानायक लेझिम संघ तडोळा, पंचशील लेझीम संघ आलुर , भीम ज्योत लेझीम संघ खैराट, यांनी विविध कला पथक दाखव लेझीम खेळ खेळले याचेसर्वत्र कौतुक होत आहे.**

### भीम योद्धा ज्येष्ठ सामाजिक पुरस्कार

**नामदेव कलप्पा सोनकांबळे (जेष्ठ समाजसेवक), कलप्पा धर्मा गायकवाड (जेष्ठ समाजसेवक), कलप्पा दूर्गापा बनसोडे (जेष्ठ समाजसेवक), चीतानंद शिवराम सोनकांबळे (जेष्ठ समाजसेवक), नागू तुका बनसोडे (जेष्ठ समाजसेवक), विजयकुमार गणपती गायकवाड (जेष्ठ समाजसेवक), अवलपा दुर्गपा बनसोडे (जेष्ठ समाजसेवक), लक्ष्मण बसणा गायकवाड (जेष्ठ समाजसेवक), लाडपा शिवराम गायकवाड (जेष्ठ समाजसेवक), यशवंत कल्याणी गायकवाड (जेष्ठ समाजसेवक), मारुती लक्ष्मण सोनकवडे (जेष्ठ समाजसेवक).**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### सराईत गुन्हेगार बजरंग चव्हाणविरुद्ध एमपीडीए

सोलापूर : शहरातील सराईत गुन्हेगार बजरंग नागनाथ चव्हाण (वय २९, रा. सनमडीकर हॉस्पिटल जवळ, सातारा रोड, जत, सांगली) याच्याविरुद्ध एमपीडीए अन्वये कारवाई करण्यात आली. त्याला येरवडा कारागृह पुणे येथे दाखल करण्यात आले आहे.

बजरंग चव्हाण हा मागील काही वर्षांपासून सातत्याने जीवघेणे घातक शस्त्राने इच्छापूर्वक दुखापत करणे, जबरी चोरी करणे, घरफोडी करणे,मोटारसायकल चोरी करणे, बेकायदेशीर जमाव जमवणे, दगडफेक करणे आणि घातक शास्त्राने धमकावणे यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे साथीदारांच्या मदतीने अवैध आर्थिक फायदा मिळवण्यासाठी केला आहे. त्याच्याविरुद्ध अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाची एकूण ७ गुन्हे शहरात विविध पोलीस ठाण्यात दाखल आहेत. शहरातील एमआयडीसी, जोडभावी पेठ आणि




फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यामुळे त्याची शहरातील सामान्य नागरिकांमध्ये दहशत असून, त्याच्याविरुद्ध सामान्य नागरिक उघडपणे पोलिसांना माहिती देत नाहीत. चव्हाण यास त्याच्या गुन्हेगारी कराव्यापासून परावृत्त करण्यासाठी २०२२ मध्ये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर त्याच्या वर्तनात कोणता बदल झाला नाही. त्यानंतरही त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा होईल अशी गुन्हेगारी कृत्य सुरू ठेवले. त्यामुळे त्याचे गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध करण्यासाठी पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी सोमवारी (दि.२८) त्याच्याविरुद्ध एमपीडीए अधिनियम १९८१ चे कलम ३ अन्वये स्थानबद्धतेचे आदेश निर्गमित करून त्यास सोमवारी (दि. २८) रोजी स्थानबद्ध आदेशाची बजावणी करून येरवडा कारागृह पुणे येथे दाखल केले आहे.

### बंद घर फोडून ८७ हजारांचा ऐवज पळविला

सोलापूर : उत्तर सोलापूर तालुक्यातील कुमठे येथे बंद घराचे दार तोडून घरात प्रवेश करीत कपाटांमधील सोन्या-चांदीचे दागिने रोख रक्कम असा ८७ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना रविवारी (दि.२७) घडली. याप्रकरणी दिलीप बाबुराव भोपळे (वय ५५ रा. मु. पो. कुमठे) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यास फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादीच्या घरातील लोखंडी कपाटतील लॉकरमधील दहा ग्रॅम सोन्याचे गंठण, ५० ग्रॅम चांदीचे पैंजण, अडीच ग्रॅम सोन्याचे कानातील रिंग, अडीच ग्रॅम कानातील सोन्याचे फुले व रोख रक्कम अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# पडघ्यातील ओहळाला गटाराचे स्वरूप

## परिसरात रोगराई पसरण्याची भीती; स्थानिकांकडून स्वच्छ करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील पाण्याचे मुख्य स्त्रोत असलेला ओहोळ स्वच्छ करण्याची मागणी माजी सरपंच शंशाक तांबोळी यांनी

लेखी निवेदनाद्वारे ग्रामपंचायतीकडे केली आहे. पडघ्यातील ओहळाला गटाराचे स्वरूप आले असून परिसरात दुर्गंधी पसरली आहे. तसेच रोगराई पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे स्थानिकांकडून ग्राम प्रशासनाच्या कारभारावर रोष व्यक्त करण्यात येत आहे.

ओहळावर पावसाळ्यात गणेशोत्सवदरम्यान गणपती विसर्जन व इतर धार्मिक विधी होत असतात. तसेच या ठिकाणी स्मशानभूमी असल्याने पडघे गावासाठी त्याचे वेगळे महत्त्व आहे. तसेच गणेशघाट व. स्मशानभूमी सुशोभीकरणाच्या नावाखाली लाखो रुपये खर्च करून कामे करण्यात आली आहेत. परंतु प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे पाण्याचे मुख्य स्त्रोत असलेल्या ओहळमध्ये रहिवाशी इमारतीचे घाण पाणी सोडले जात आहे.

शिवाय परिसरातील नागरिक कचरा, प्लास्टिक टाकत असल्याने ओहळाला गटाराचे स्वरुप प्राप्त झाले आहे. तसेच सोडलेले घाण पाणी एकाच ठिकाणी साचून राहिल्याने दुर्गंधी



पसरली आहे. त्यामुळे परिसरात रोगराई पसरण्याची भीती व्यक्त होत आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गणपती विसर्जन होत असल्याने ग्रामपंचायतीने खर्च करून गणेश घाटसुद्धा बांधला आहे. त्यामुळे ओहळातील गाळ काढून आजूबाजूचा परिसर स्वच्छ करावा व गटाराचे पाणी ओहळात सोडले जात असेल ग्रामपंचायत कमीटी व प्रशासनाने त्याचे वेगळे नियोजन पावसाळ्यापूर्वी करावे, अशी मागणी पडघा येथील ग्रामस्थ व ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शंशाक तांबोळी यांनी लेखी निवेदनाद्वारे ग्रामपंचायत पडघा यांच्याकडे केली. दरम्यान आमदार शांताराम मोरे, सरपंच रवींद्र विशे, ग्रामपंचायत सदस्य यांनी ओहळाची पाहणी करून ही समस्या लवकर सोडवणार असल्याचे आश्वासन दिले. त्यामुळे पडघावासीयांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

# निफाड तहसील कार्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचा ६६ वा स्थापना दिवस समारंभ दिनांक १ मे २०२५ रोजी सकाळी आठ वाजता मध्यवर्ती प्रशासकीय इमारत रसलपुर शिवार निफाड येथे साजरा करण्यात आला असून आ. दिलीप बनकर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथसंचलन व गीत गायन केले,याप्रसंगी महाराष्ट्र शासनाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणी करून निफाड

**आमदार दिलीप बनकर यांचे हस्ते ध्वजारोहण**

तालुक्यामध्ये महसूल प्रशासनाने लाभार्थ्यांना ॲग्री स्टॅग (शेतकरी क्रमांक) प्रमाणपत्र जिवंत ७/१२ उतारा,



रेशन कार्ड ,शिधापत्रिका, दिव्यांग लाभार्थी, संजय गांधी योजनेचा. लाभ देण्यात आलेल्या लाभार्थी व नवीन मतदारांना मतदान कार्ड मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश पालवे, उपनगराध्यक्ष अनिल पा कुंदे, नगरसेवक सागर कुंदे आदी पदाधिकारी व सर्व शासकीय कार्यालयाचे कार्यालय प्रमुख व कर्मचारी पत्रकार बांधव निफाड तालुका वकील संघाचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माऊली राखुंडे यांनी केले.

# निफाड नगरपंचायतच्या वतीने १ मे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचा ६६ वा स्थापना दिवस. निफाड नगरपंचायत कार्यालयाच्या आवारात ध्वजारोहण समारंभ साजरा करण्यात आला या वेळी नगरसेविका अलका निकम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.. वैनतेय शाळेचे विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताचे गायन केले.

नगराध्यक्षा शारदा कापसे, उपाध्यक्ष अनिल कुंदे, मुख्याधिकारी अमोल चौधरी माजी नगराध्यक्ष राजाभाऊ शेलार, नगरसेविका रूपाली रंधवे, नगरसेविका डॉ कविता धारराव तसेच नगरसेवक साहेबराव बर्डे, सागर भाऊ कुंदे, किशोर ढेपले, जावेद शेख , सागर गीते, बंटी शिंदे व शहरातील प्रतिष्ठित नागरिक व नगरपंचायतचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



# स्वेरीमध्ये ‘सिव्हिकॉन २.०’ हा राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक महोत्सव संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या सिव्हील इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने शनिवार, दि.२५ एप्रिल २०२५ रोजी ‘सिव्हिकॉन २.०’ या राष्ट्रीय स्तरावरील भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. बांधकाम क्षेत्राशी निगडीत असलेल्या या स्पर्धात्मक उपक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली व



विभागप्रमुख डॉ. एस. पी. पाटील यांच्या सहकार्याने ‘सेसा’ तथा ‘सिव्हिल इंजिनिअरिंग स्टुडन्ट असोसिएशन’, आय. जी. एस. पुणे चॅप्टर, स्टार्टअप स्पार्क क्लब आणि आय.आय. सी. यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे उदघाटन स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) चे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांच्या हस्ते व संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए. पी. केने यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. ‘सिव्हिकॉन २.०’ या तांत्रिक स्पर्धेमध्ये जिओ बजर, सॉईल आर्ट, क्लोन लॉजिक, थिंक टँक अशा तांत्रिक व मनोरंजनात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ म्हणाले की, ‘थिंक टँक’सारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या विचारांना आणि नवकल्पनांना बळकटी मिळणार आहे. उद्योजकतेबद्दलची जागरूकता निर्माण होण्यास मदत मिळणार आहे. स्वयंपूर्ण उद्योजक बनण्याची प्रेरणाही त्यांना या कार्यक्रमातून मिळणार आहे. त्यामुळे अशा स्पर्धात्मक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आवर्जून सहभाग घेतला पाहिजे. यामुळे भविष्यात आपल्या तांत्रिक वाटचालीस नवी दिशा देखील मिळणार आहे.’ यावेळी सिव्हील इंजिनिअरिंग विभागात सर्वत्र स्पर्धात्मक वातावरण दिसून येत होते. सर्व

भिंतीवर बांधकामाच्या विविध कलाकृती, आकर्षक सजावट केल्याचे दिसून आले. स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्रे देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. स्पर्धक विद्यार्थ्यांनी मातीकामातून मंदिराच्या बांधकामाचे, कळसाचे, ग्रामीण भागातील पूर्वीचे भक्कम बांधकाम असलेल्या वास्तूच्या विविध कलाकृती मातीकामातून बनवल्या होत्या. या कलाकृती पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रचंड गर्दी केली होती. यावेळी स्वेरीचे सचिव व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, विभागप्रमुख डॉ. एस. पी. पाटील व प्रा. पूजा रोंगे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. पी. एच. गुंड यांनी काम पाहिले तर या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. एम. व्ही. डोंगरे व सिव्हील इंजिनिअरिंग विभागातील सर्व प्राध्यापक तसेच सजल वाघमारे, संचित झुंजकर, भूषण बागल, उदयराज आव्हाड, तेजस सुडके आदी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. एकूणच सिव्हील इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचे विविध नमुने सादर केले होते.

**चार मे रोजी होणार पुरस्कार वितरण** | **मान्यवरांच्या हस्ते होणार पुरस्कार वितरण सोहळा**

# राज्यातील १५ महिला शिक्षिकांना नारीशक्ती पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शिक्षणक्षेत्रात विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी कार्य करणाऱ्या आणि विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता व संस्कार रुजवणाऱ्या राज्यातील विविध जिल्ह्यातील पंधरा महिला शिक्षिकांना वुमन टीचर्स फोरम व स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशन अर्थात सर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा 'राज्यस्तरीय नारीशक्ती सन्मान पुरस्कार-२०२५' जाहीर झाला आहे. सोलापूर येथील शिवछत्रपती रंगभवन सभागृह येथे ४ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा परिषद सोलापूरचे मुख्यकार्यकारीअधिकारी मा.कुलदीप जंगम व प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे. यावेळी परीक्षा परिषद,पुणेचे उपायुक्त ,संजयकुमार राठोड, जिल्हा परिषद सोलापूर प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख, शिक्षण व दिव्यांग क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्या मा. सुजाता लोहोकरे, समाजकल्याण सोलापूरच्या सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे, राज्य कामगार विमा रुग्णालय मुंबईचे मुख्य प्रशासन अधिकारी डॉ. शशिकांत शिंदे व महिला बालविकास जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.




सर फाउंडेशन हे देश स्तरावरील प्रयोगशील व उपक्रमशील शिक्षकांचे नेटवर्क आहे. याद्वारे विविध उपक्रमांच्या माध्यमातून गुणवत्ता विकास व शिक्षकांचे सक्षमीकरण साधण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचाच भाग म्हणून महिला दिनानिमित्त राज्यस्तरीय नारीशक्ती सन्मान पुरस्कार सोहळा आयोजित केला जातो. नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींचा स्वीकार, उपक्रमशीलता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न आणि त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राज्यातील १५ आणि सोलापूर जिल्ह्यातील ३१ महिला शिक्षिकांची निवड करण्यात आली आहे. शिक्षण क्षेत्रासाठी भरीव असे योगदान दिल्याबद्दल त्यांच्या कार्याचे कौतुक करून त्यास अधिक बळकटी देण्यासाठी त्यांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती फाउंडेशनच्या राज्य समन्वयक सौ. हेमा शिंदे-वाघ यांनी सांगितले. पुरस्कार प्राप्त सर्व महिला शिक्षिकांचे सर फाउंडेशनचे समन्वयक हेमा शिंदे, सिद्धाराम माशाळे, बाळासाहेब वाघ, यांनी पुरस्कार निवडीबद्दल अभिनंदन केले आहे.

नारीशक्ती सन्मानाच्या माध्यमातून महिला शिक्षकांना प्रेरणा देण्यासाठी हा कौतुक सोहळा आहे. पुरस्कार प्राप्त महिला शिक्षिकांचे कार्य कौतुकास्पद आहे . शिक्षण क्षेत्रात तळमळीने कार्य करणारे व शिक्षणातील आव्हाने समजून घेऊन आधुनिक तंत्राचा अवलंब करत सेवेला निष्ठेची जोड देणाऱ्या शिक्षकांचा हा समूह आहे. सर फाउंडेशन टीम शिक्षण क्षेत्रासाठी सतत नाविन्यपूर्ण कार्यक्रम राबवत असते. हा सन्मान सोहळा त्याचाच एक भाग आहे.-

हेमा शिंदे-वाघ (महिला राज्य समन्वयक-सर फाऊंडेशन व वुमन टीचर्स फोरम)

पुरस्कार विजेत्यांचे विविध जिल्ह्यातील समन्वयक अनघा जहागिरदार, नवनाथ शिंदे, विजयकुमार वसंतपुरे, गुणवंत चव्हाण, सतीश सातपुते, शोभा माने, समाधान शिकेतोड, मंजुषा स्वामी, वासंती कोदांडे, दिपाली बाभूळकर यांनी अभिनंदन केले आहे.

### राज्यस्तरीय नारीशक्ती सन्मान पुरस्कार प्राप्त शिक्षिका

**प्रतिभा वसंतराव जोशी-अकोला, शीला जानरावजी मसराम-अमरावती, नीता भास्कर अरसुळे-जालना, ज्ञानेश्वरी आनंदराव शिंदे-धाराशिव, योगिनी यल्लाप्पा वैदू-रायगड, सत्यदेवी किशनराव बनवसकर-रायगड, अंजली कमलाकर स्वामी-लातूर, महादेवी धोंडीराम पाटील-सांगली, मनीषा शंकर रामगुडे-सातारा, मंगला सुरेश नाईकनवरे- सोलापूर, सोनी प्रभाकर कानडे- माळशिरस सोलापूर, सौ.ज्योती सचिन कलुबर्मे-मंगळवेढा, सोलापूर,प्रतिभा सुरेश जाधव-दक्षिण सोलापूर,सोलापूर, किशोरी शिवाजी भोर-अहिल्यानगर, अश्विनी चंद्रकांत चव्हाण-सोलापूर**
.

### जिल्हास्तरीय नारीशक्ती सन्मान पुरस्कार प्राप्त शिक्षिका

**अक्कलकोट तालुका-शकुंतला श्रीशैल हाडसंग,मोनालिसा डॅनियल नायडू, उत्तर सोलापूर तालुका- संगीता श्रीपादराव कुलकर्णी, शुभांगी सुधाकर पवार, सुजाता चंद्रकांत घोळवे, करमाळा तालुका- उज्वला आदिनाथ राऊत,रत्नमाला दत्तात्रय होरणे, *दक्षिण सोलापूर तालुका-अफरोज उसमान शेख,मंजुषा नितीन कलशेट्टी,अनिता संजय चव्हाण,*पंढरपूर तालुका- वैशाली अभिमन्यू वाघमारे,कल्पना सुकदेव आवताडे,अश्विनी राहुल उबाळे, बार्शी तालुका- वंदना शरद कुलकर्णी,वैशाली खताळ-जांभळे, मंगळवेढा तालुका- रंजना भाऊसो फुले,राणूबाई जगन्नाथ शिंदे, राजश्री काशिनाथ बुगडे, माढा तालुका-अंजली मोहनराव घोटे,दीपिका बाबासाहेब जाधव, माळशिरस तालुका-राजश्री लक्ष्मण कणबुर,अर्चना लक्ष्मण वाघ,सोनल नागनाथ गायकवाड, मोहोळ- अर्चना जालिंदर घुगे,रंजीवनी योगीराज इंगळे, सांगोला तालुका-पल्लवी रामचंद्र मेणकर,सावित्रा गोरख कस्तुरे, सोलापूर शहर-आफ्रिन आसिफ तारानाईक,ज्योती रमेश घंटेनवरू,लता सतीश यामजले व लक्ष्मी गणेश कनकधर अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत.**

## थोडक्यात...

### खंडणी प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर : सिद्धेश्वर नगर येथे वारंवार फोन करून तुझी दैनिकांमध्ये बातमी देऊन बदनामी करीन त्याबद्दल तू मला पाच लाख रुपये दे म्हणत वारंवार मानसिक त्रास दिल्याची घटना ५ ते १० एप्रिलपर्यंत घडली. याप्रकरणी पाणीसा जहर बोराम णीकर (वय-४५,रा.सिद्धेश्वर नगर भाग चार मजरेवाडी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून मुनीर शेख (रा.नवीन विडी घरकुल), यास्मिन मुजाहिद शेख आणि जहर अब्दुल-गणी बोरामणीकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, यातील संशयित आरोपींनी संगनमत करून संशयित आरोपी मुनीर शेख यांनी फिर्यादीस वारंवार फोन करून तुझी दैनिकात बातमी देऊन बदनामी करेन त्याबद्दल तू मला पाच लाख रुपये दे अशी मागणी केली. तसेच संशयित आरोपी यास्मिन शेख हिने मोबाईलवर फोन करून तुझ्या पतीसोबत भांडण मिटवून घे नाहीतर मी तुझी चैनलला बातमी लावून बदनामी करते असे म्हणून फिर्यादीचे पती संशयित आरोपी जहूर बोराम णीकर यांनीही सांगितल्याप्रमाणे आम्हाला पाच लाख रुपये दे नाहीतर बातमी द्यायला सांगून बदनामी करून तुझी नोकरी घालवतो अशी धमकी दिली व लाथाबुक्क्यांनी म ारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

### स्टोररूम फोडून १९ हजारांचा ऐवज पळविला

सोलापूर : गुरुनानक चौक येथील आरोग्य प्रशिक्षण केंद्राचे स्टोर रूमच्या मागील बाजूच्या दरवाजाचे कुलूप तोडून १९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना सोमवारी (दि.२१) दरम्यान घडली. याप्रकरणी डॉ. अश्विनी चंद्रकांत जिडगे (रा.नाथ प्राइड अपार्टमेंट सिव्हील हॉस्पिटल) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# नमामि चंद्रभागा योजनेच्या कृती आराखड्यास मान्यता

## आ. समाधान आवताडे यांची माहिती ; सन २०२८ पर्यंत कालावधी करण्यात आला आहे निश्चित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनीधी

नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पंढरपूर मंगळवेढा मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांनी विधानसभेत लक्षवेधी प्रश्नावेळी बोलताना नमामि चंद्रभागा योजनेचीअमलबजावणी कागदावरच असल्याचे निदर्शनास आणून देत या बाबत शासनाने एक कृती आराखडा जाहीर करावा अशी मागणी केली होती. विठ्ठल दर्शनासाठी येणारे लाखो भाविक पहिल्यांदा चंद्रभागेचे पवित्र स्नान करून तिचे तीर्थ तोंडात घेतात आणि मग विठुरायाच्या दर्शनाला जात असतात. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून चंद्रभागेच्या पात्रात असलेली प्रचंड घाण,दुर्गंधी तसेच शेवाळे आणि कचऱ्याचे ढीग यामुळे येथे आलेले भाविक प्रचंड नाराजी व्यक्त करताना दिसून येत होते.आमदार समाधान आवताडे यांनी मागील आषाढी यात्रा कालावधीत चंद्रभागा नदी पत्रास अचानक भेट दिली असता त्या ठिकाणी दिसून आलेल्या बकाल अवस्थेबद्दल मोठी नाराजीही व्यक्त केली होती.तर विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशातदेखील चंद्रभागा नदी प्रदूषणाची वारंवार निर्माण होणारी गंभीर परिस्थिती लक्षात घेत नमामि चंद्रभागा योजनेच्या कार्यवाहीस गती देण्याची मागणी केली होती.आता शासनाने या ३० एप्रिल २०२५ रोजी नमामि चंद्रभागा योजनेच्या कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्याचे आदेश काढले आहेत.



राज्य शासनाने ३० एप्रिल रोजी मंजुरी दिलेल्या नमामि चंद्रभागा कृती आराखड्याची कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधीकारी स्तरावरीलकार्यकारी समितीने कृती आराखड्याच्या प्रभावी अंलबजावणीची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.नमामि चंद्रभागा योजनेची संपूर्ण कार्यवाही २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. तसेच जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ व त्यामध्ये वेळोवळी केलेल्या सुधारणांनुसार तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ म धील तरतूदींनुसार प्रदूषण नियम ांचे पालन न करणाऱ्या तसेच प्रदूषणास कारणीभूत ठरणारे उद्य-ोग / स्थानिक स्वराज्य संस्था/ व्यक्ती यांच्यावर कायद्यातील विहीत तरतूदींनुसार आवश्यक कारवाई करणेबाबतची दक्षता संबंधित यंत्रणेने घ्यावी लागणार आहे.चंद्रभागा प्रदूषणासाठी जबाबदार असणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेने प्रदूषणामुळे होणाऱ्या नुकसानीचा खर्च भरपाई बंधनकारक करण्यात आली आहे. नगर विकास विभागाने दि.१२/०८/२०१६ व दि.०४/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये नमामि चंद्रभागा प्राधिकरण व नमामि चंद्रभागा अभियानाची अंम लबजावणी करण्यासाठी घेतलेल्या निर्णयानुसार करावयाच्या उपाययोजना याबाबत संबंधित विभागांनी आवश्यक दक्षता घ्यावी.संबंधित शासकीय कार्यालये/ मंडळे / स्थानिक स्वराज्य संस्था यांनी स्थानिक नागरीक, पर्यावरण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, स्थानिक मंडळे, शाळा व महाविद्यालये यांना सदर आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने सहभागी करून घ्यावे अश-ाही मार्गदर्शक सूचना शासनाने ३० एप्रिल रोजीनमामि चंद्रभागा योजनेच्या कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यास मान्यता देताना देण्यात आल्या आहेत.

# मंगळवेढा बस स्थानकाचे काँक्रिटीकरणाचे काम मे महिन्यापूर्वी पूर्ण करा : आ. समाधान आवताडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/पंढरपूर/प्रतिनिधी: मंगळवेढा बस स्थानकाला पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधान आवताडे यांनी भेट देऊन सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेतला. याप्रसंगी त्यांनी प्रवाशांच्या व शालेय विद्यार्थ्यांच्या अडी-अडचणी जाणून घेतल्या. तसेच बसस्थानकाचे अंतर्गत काँक्रिटिकरण काम गेल्या सहा महिन्यांपासून बंद अवस्थेत असल्याने संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता यांना दिल्या. तसेच सदरचे काम पावसाळ्यापूर्वी मे महिन्याच्या आत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

**आमदार समाधान आवताडे यांनी केली मंगळवेढा बस स्थानकाची पाहणी**

शहरी व ग्रामीण जीवना-ची जीवनवाहिनी अधिक बळकट करण्यासाठी व बसस्थानक नूतनीकरणासाठी आमदार समाधान आवताडे यांनी सातत्याने पाठपुरावा करून मंगळवेढा बसस्थानकास करोडोचा मुबलक विकासनिधी प्राप्त करून घेतल्याने बसस्थानक आवारा-तील विविध विकासकामे पूर्णत्वाच्या प्रगती पथावर आली आहेत.

आजही समाज व्यवस्थेच्या विशेषतः ग्रामीण भागात वाहतुकीचे प्रभावी साधन म्हणून एसटी कडेच पाहिलं जात असल्यामुळे साम ान्यांच्या जिव्हाळ्याची 'लालपरी'च्या सुविधा आणखी गतिमान होण्यासाठी आपण कायम कटीबद्ध आहोत अशी भूमिका घेऊन बसस्थ-ानक व्यवस्थापकीय प्रशासन आणि अधिकारी व पदाधिकारी यांना आवश्यक सूचना करुन कार्यवाही करण्याचे सूचित केले. यावेळी पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, विद्या विकास मंडळाचे सचिव ड रमेश जोशी, माजी संचालक श्री. लक्ष्मण जगताप, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य श्री. अजित जगताप, माजी नगरसेवक श्री. कैलास कोळी, श्री. पांडुरंग नकाते, पत्रकार श्री. प्रशांत मोरे, माजी ग्रामपंचायत सदस्य श्री. पिंटू मोहिते आदींसह सहकारी तसेच प्रवासी आणि कर्मचारी बांधव उपस्थित होते.

## राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षातर्फे पहलगाम येथिल भ्याड हल्ल्याचा निषेध




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : २२ एप्रिल २०२५ रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला, यामधे आपल्या देशातील तसेच विदेशातील देखिल काही पर्यटकांवर गोळ्या झाडन्यात आल्या ,यामध्ये २७ पर्यटकांना आपला जिव गमवावा लागला व काही पर्यटकांवर अजून उपचार सुरू आहेत.

या निमित्ताने रमझान शेख प्रदेश संगठक सचिव राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार आणि खारघर शहर अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार ज्ञानेश्वर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर नवी मुंबई येथे निषेध सभा व मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच याप्रसंगी रमझान शेख यांनी तीव्र शब्दात आतंकवाद्यांबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या, शरदचंद्र पवार साहेबानी विचार व्यक्त केले की सर्व विरोधी पक्ष यावेळी केंद्र सरकारच्या मागे भक्कमपणे उभे आहेत , काश्मीर तसेच आपल्या महाराष्ट्रातील कोकण हे पर्यटनासाठी प्रसिद्ध जागा आहेत तरी पुढील काळासाठी केंद्र आणि राज्य सरकारने पर्यटकांच्या सुरक्षेबद्दल कठोर पावले उचलावीत अशी भावना व्यक्त करण्यात आली.

# शेतकरी सहकारी भात गिरणी लि. पडघा सोसायटी मतदानाचा भोंगळ कारभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : शेतकरी सहकारी भात गिरणी लि पडघा सोसायटीचा ५४५ सभासदांना अंधारात ठेवून बेकायदेशीर निवडणूक घेण्यात आलेली आहे. तसेच यासंदर्भात कोर्टात दावा दाखल केला आहे. तर सहाय्यक निबंधक यांच्याकडे तक्रार केली आहे.असा गोप्य स्फोट शेतकरी सहकारी भात गिरणी पडघा सोसायटीचे म ाजी संचालक लक्ष्मण गोष्टे यांनी पडघा येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केल्याने परिसरात खळबळ माजली आहे. पडघा शेतकरी आज गिरणी सोसायटीची निवडणूक बिनविरोध झाल्याने परिसरात एक खळबळ उडाली होती मुलात अशा प्रकारे निवडणूक कधी जाहीर झाली होती याचा प्रश्न सर्व सामान्य शेतकऱ्यांना पडला होता त्यातच या विरोधात भातगिरणीचे माजी संचालक

लक्ष्मण गोष्टे यांनी विद्यमान नवनिर्वाचित संचालकांवर गंभीर आरोप करत ही निवडणूकच बेकायदेशीर असल्याचा आरोप केला आहे त्यांच्यासोबत

नितीन चंदे, सुरेश पारधी, गुरुनाथ गायकर ,गुरुनाथ मते, गुरूनाथ मोरे यांनी मिळून न्यायालयाकडे दाद मागितली आहे. सोसायटीच्या उपविधीमध्ये स्पष्ट म्हटले आहे .की, जे सोसायटीचे लाभार्थी आहेत त्यांना संचालक होता येत नाही. या बिनविरोध निवडून आलेल्या संचालकांना मधून अनेक संचालकांनी सोसायटीच्या नवीन इमारतीमध्ये अत्यंत कमी भावाने गाळे भाड्याने घेतलेले आ-हेत. ज्यांचे गाळे आहेत ते संस्थेचे हित कसे पाह-तील? नियमाप्रमाणे त्यांना सभासद होता येत नाही. ही देखील बाब आम्ही न्यायालयाला लक्षात आणून दिली आहे. निवडणूक ही पाच वर्षांने होते. परंतु या संदर्भात काही प्रकरण न्यायालयात असल्यामुळे सुमारे ८ वर्षानंतर ही निवडणूक अचानक लागली. यांची कुठलीही माहिती संगणमताने निवडणूक घेणाऱ्यांनी कोणालाही कळू दिली नाही. असा देखील आरोप शेतकरी सहकारी भात गिरणी पडघा सोसायटीचे माजी संचालक लक्ष्मण गोष्टे यांनी केला आहे.

**माजी संचालक लक्ष्मण गोष्टे यांचा आरोप**

सोसायटीच्या सर्व सभासदांना निवडणुकी संदर्भात कळविणे आणि विशेषतः रविवारी ही सभा घेणे. किंवा निवडणुकी संदर्भात चर्चा करणे. या बाबी आवश्यक असताना त्यांनी काहीच केलेलं नाही. निवडणूक प्रक्रिया प्रसिद्ध करतांना. सर्वांना कळविणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या ठिकाणी बोर्ड लावणे आवश्यक आहे.असे काही न करता शेतकरी सहकारी भात गिरणी पडघा सोसायटीची निवडणूक बेकायदेशीर रित्या घेतली आहे. असा आरोप शेतकरी सहकारी भात गिरणी पडघा सोसायटीचे माजी संचालक लक्ष्मण गोष्टे यांनी केला आहे. या निवडणुकीमध्ये ज्यांनी फॉर्म भरले. ज्याचावर सूचक, अनुमोदक म्हणून सह्या असाव्या लागतात. हे सूचक आणि अनुमोदक सुद्धा त्यांच्याच घरचे आहेत.हे कोणालाही माहिती पडू नये. म्हणून सर्व त्यांनी कारस्थान




केले आहे. जर १६ उमेदवार सोडले तर सोसायटीच्या सर्व सभासदांचा सर्वानुमते आम्हाला पाठिंबा आहे. या संदर्भात आम्ही न्यायालयात गेलेलो आहोत. तसेच सहाय्यक निबंधक यांच्याकडे सुद्धा तंक्रार केली आहे. आम्हाला खात्री आहे.ही निवडणूक रद्द होईल. आमचा विजय होईल.जर आमच्या विरोधात जर निकाल लागला तर आम्ही सुप्रीम कोर्टात, हाय कोर्टात न्याय मागू असे पत्रकार परिषदेत शेतकरी सहकारी भात गिरणी लि पडघा सोसायटीचे माजी संचालक लक्ष्मण गोष्टे यांनी बोलतांना सांगितले.

**श्री दिनकरभाऊ मोरे कृषीनिष्ठ तर श्री नागेश बनसोडे चळे भूषण पुरस्काराने सन्मानीत**

**महाराष्ट्र दिनानिमित्त विविध क्षेत्रातील ३९ व्यक्ती व विद्यार्थी, महिलांचा विशेष सन्मान**

# लोकविकासाचे सिध्दनाथ पुरस्कारास वेगळे अधिष्ठाण प्राप्त होणार : ह.भ.प. रामकृष्ण वीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चळे/प्रतिनिधी : सिध्दनाथ सार्वजनिक मुक्त वाचनालय चळे व लोकविकास शेतकरी बचत गट मर्या. चळे ता. पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रात उल्लेखनिय काम करण्या-या व्यक्तीची दुरदृष्टीने निवड करुन त्यांना लोकविकासाचे सिध्दनाथ या बिरुदावलीने देण्यात येणा-या पुरस्कारास भविष्यात महत्वाचे अधिष्ठान प्राप्त होणार असा दृढ शुभेच्छापर विश्वास ह.भ.प. राम कृष्ण हणमंत महाराज वीर यानी व्यक्त केला. त्यांनी महाभारतातील अनेक उदाहरणांचा दाखला देत चांगले जीवन चरीत्र म्हणजे काय हे सांगत वाचन माणसाला वेगळ्या उंचीवर पोहचवते असे सांगत उत्कृष्ट जीवनशैलीचे चरीत्र उपस्थीत जनसमुदाया समोर उभा केले. महाराष्ट्र गीताने व डॉ.एस.आर.



रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.

ते या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते त्यांच्या शुभहस्ते जगद्गुरु संत तुकाराम महाराज जेष्ठ कृषीनिष्ठ पुरस्कार कर्मयोगी सु.प. पांडुरंग कारखान्याचे माजी चेअरमन श्री दिनकर भाऊ मोरे तर श्री दर्लिंग चळे भूषण पुरस्कार श्री नागेश हरी बनसोडे एपीआय (डोंबिवली) यांना प्रदान करण्यात आला. या वेळी म हाराष्ट्र साहित्य परीषद पुणे विभागीय कार्यवाहक कल्याणराव शिंदे, महाराष्ट्र पत्रकार संघ मुबई पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील , पंढरपूर तालुका माजी सैनिक संघटना अध्यक्ष बळीराम चौगुले, ह.भ.प.सुब्राव गायकवाड, सहकार शिरोमणीचे संचालक बाळासाहेब माने, सरपंच शालन शिखरे, उपसरपंच मेघा मोरे, ग्रामपंचायत सदस्या सौ. दिपाली गायकवाड यांच्या उपस्थीतीत श्री संत सावता माळी प्रयोगशील युवा शेतकरी पुरस्कार सागर शिंदे, नेताजी सुभाषचंद्र बोस व शहीद विठ्ठल मिसाळ स्मृती गौरव पुरस्कार श्री दत्तात्रय घाडगे, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आध्यात्म प्रसार प्रचारक पुरस्कार श्री कुबेर फुगारे, क्रांतीसूर्य म हात्मा ज्योतीराव फुले आदर्श शिक्षक (प्राथमिक) श्री विकास बढे, भार-तरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम आदर्श शिक्षक (माध्यमिक) श्री अमरसिंह चव्हाण, स्वामी विवेकानंद युवा उद्योजक प्रेरणा पुरस्कार श्री हरी गायकवाड, जिजाऊ- सावित्री-

**या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री दिनकरराव मोरे, प्रमुख पाहुणे कल्याणराव शिंदे पुरस्कार प्राप्त प्रतिनिधी श्री अम रसिंह चव्हाण , सागर शिंदे , जे. बी. गायकवाड यांनी मनोगतात संस्थेच्या कार्याचे कौतुक करत भविष्यात म दत व सहकार्य करण्याचा विचार व्यक्त करत कार्यक्रम ास शुभेच्छा देत आभार व्यक्त केले .**

अहिल्या यशोदिप अंगणवाडी पुरस्कार (बरडवस्ती अ. क्र. ४) सेविका सौ. सुजाता वाघमारे, मदतनिस सौ.निशा वाघमारे , आनंदीबाई जोशी उत्कृष्ट आरोग्य सेविका पुरस्कार शैलजा कुंभार , बचतगट विभाग पुरस्कार- समतेचे पुरस्कर्ते छत्रपती राजर्षि शाहु महाराज उत्कृष्ट गुंतवणूकदार पुरस्कार श्री तानाजी पवार, श्री सुरेश गंगथडे , सौ. जनाबाई मोरे, सौ. कमल म ोरे, तर गर्जा महाराष्ट्र माझा नियमित गुंतवणुकदार श्रीमती पार्वती कांबळे , श्रीमती संगीता इंगोले , श्रीमती शामल गायकवाड, वाचक विभाग - डॉ. एस.आर. रंगनाथन आदर्श ग्रंथवाचक पुरस्कार श्री राजाराम माने (सौदणे ता. मोहळ) महिला विभाग सौ.प्रियंका मोरे, आचार्य बाळशास्त्री जांभेकर उत्कृष्ट वृत्तपत्र जेष्ठ वाचक श्री ज्ञानेश्वर मोरे, श्री विलास मोरे, श्री राहुल वाघमारे (युवक) विद्यार्थी माध्यमिक विभाग- कु. विश्वाजली वाघ, कु. सुरमई मोरे, संस्कार बनसोडे, प्राथमिक विभाग कु. श्रुती मोरे, दत्ता कांबळे , सुर्या गायकवाड, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर गुणवंत पुरस्कार (माध्यमि क व कनिष्ठ महाविद्यालय) श्रेया शिखरे, संग्राम मोरे, श्रुती गायकवाड पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील गुणवंत विद्यार्थी (प्राथमिक विभाग) रणजित कुंभार , श्रवण कोळी , भारतीय गणिततज्ञ श्रीनिवास रामान-ुजन बुध्दीवत ज्ञानवंत विद्यार्थी (शिष्यवृत्ती परीक्षा) आदित्य रणवरे, कु. धनश्री शिंदे , कु.प्रेरणा देवळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज उत्कृष्ट सेवा कार्य व सेवापूर्ती पुरस्कार माध्यमिक श्री जालिंदर गायकवाड, प्राथमिक सौ. स्वाती नागणे, श्री आण्णासाहेब रायजादे, श्री ब्रम्हदेव घाडगे यांचा सन्मान झाला. प्रास्ताविक व आभार अध्यक्ष श्री अतुल मोरे, सूत्रसंचालन श्री दयानंद देवळे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ.विमल मोरे, सौ.ललिता मोरे सुधाकर घाडगे, प्रा. नितीन मोरे, सिताराम कोळी, राहुल कुंभार, शिवाजी मोरे, कु. ग्रंथाली मोरे, गौरी मोरे यांनी परीश्रम घेतले या कार्यक्रमास ग्रंथालयाचा वाचक वर्ग , बचत गटाचे सदस्य, प्राथमि क माध्यमिक विभागाचे शिक्षक, व चळे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.